22 JUN 2017
महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त सिध्दगिरी मठ, कणेरी, शिवाजी विद्यापीठ आणि महाराष्ट्र टाइम्सच्यावतीने बुधवारी आयोजित शिबिराला मोठा प्रतिसाद मिळाला. विद्यापीठाच्या लोककला केंद्रात शिबिर झाले.

►► सविस्तर वृत्तांकन... कोल्हापूर टाइम्स १





# आरोग्य 'योग'

## 'मटा'च्यावतीने आयोजित योग शिबिराला मोठा प्रतिसाद

कोल्हापूर टाइम्स टीम

विद्यापीठाचा शांत, सुंदर आणि हिरवागार परिसर, सकाळची निरव शांतता, पक्ष्यांचा हळुवार किलबिलाट नुकताच सुरू झालेला. विद्यापीठ कॅम्पसमधील हे शांत आणि आल्हाददायक वातावरण योगसाधकांचा उत्साह वाढवत होते. वातावरणातील शांतता भंग पावणार नाही, याची दक्षता घेत तितक्याच हळुवार आणि सहजपणे येणाऱ्या योगसाधकांनी हळूहळू लोककला केंद्राचे सभागृह फुलून गेले आणि बुधवारचा अनोखा 'योग' जुळून आला. निमित्त होते महाराष्ट्र टाइम्सने आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे...! सुमारे दोन तास अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने सहभागींनी योगाची अनुभूती घेतली.

























22 JUN 2017
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# योग शिबिरात १५०० साधक सहभागी

## शिवाजी विद्यापीठ, सिद्धगिरी मठातर्फे योगदिन उत्साहात



कोल्हापूर : विद्यापीठात आयोजित आंतरराष्ट्रीय योगदिन उपक्रमात सहभागी साधक.

कोल्हापूर / प्रतिनिधी :

शिवाजी विद्यापीठ व श्री क्षेत्र सिद्धगिरी मठ, कणेरी यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या लोककला सभागृहात गेली दोन वर्षे सुरू असलेल्या मोफत योग शिबिराचा द्विवर्षपूर्ती समारंभ तसेच तिसरा आंतरराष्ट्रीय योग दिन बुधवारी सकाळी विद्यापीठात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या विशेष योग शिबिरात सुमारे १५०० योगसाधक सहभागी झाले. यामध्ये विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी, महिला यांच्यासह आबालवृद्धांचा समावेश होता.

जागतिक योग दिनाच्या अनुषंगाने बुधवारी शिवाजी विद्यापीठाच्या लोककला सभागृहात हा कार्यक्रम सकाळी ६.३० ते ९ या वेळेत पार पडला. पहिल्या आंतरराष्ट्रीय योग दिवसापासून म्हणजे २१ जून, २०१५ पासून 'योगशक्ती योगयज्ञ' अंतर्गत योग प्रशिक्षण कार्यक्रम सलग दोन वर्षे राबविण्यात येत आहे. या योग उपक्रमाचा दैनंदिन २०० हून अधिक साधक लाभ घेतात.



योगा करताना कुलगुरु देवानंद शिंदे.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, या दोन वर्षांत नागरिकांमध्ये योगसाधनेविषयी जागृती निर्माण करण्याबरोबरच त्यांना योगसाधना करण्यास प्रवृत्त करण्यात शिवाजी विद्यापीठ यशस्वी झाले आहे, याचे समाधान वाटते. साधकांचा हा प्रतिसाद पाहाता हे मोफत योग शिबिर कणेरी मठाच्या सहकार्याने या पुढेही राबविण्याचे कुलगुरू डॉ. शिंदे यांनी जाहीर केले.

ॲस्टर आधार हॉस्पिटलचे हृदयरोगतज्ज्ञ डॉ. सचिन पाटील यांनी 'हृदयरोग टाळण्यासाठी घ्यावयाच्या दक्षता' या विषयी साधकांना मार्गदर्शन केले. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, कणेरी येथील श्री क्षेत्र सिद्धगिरी मठाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आर. डी. शिंदे, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, माणिकराव पाटील चुयेकर, ॲस्टर आधार हॉस्पिटलचे संचालक आर. आर. देशपांडे, डॉ. संदीप पाटील यांच्यासह मठाचे अन्य साधक, विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व सेवक उपस्थित होते.

योग प्रशिक्षक दत्ता पाटील यांनी सुमारे दीड तास विविध योग प्रात्यक्षिके साधकांकडून करवून घेतली. मान्यवरांच्या हस्ते रोपट्यास पाणी घालून उपक्रमाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. दिव्यांग असूनही विद्यापीठाच्या योग शिबिरात सलग दोन वर्षे सहभागी होणारे योगसाधक सुरेश माने यांचा कुलगुरूंच्या हस्ते सत्कार करण्यात आला. डॉ. आर. व्ही. गुरव यांनी स्वागत तर डॉ. संदीप पाटील यांनी प्रास्ताविक केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 JUN 2017
Times of India

# Thousands of students, others mark yoga day

TOI



Students celebrate 3rd International Yoga Day on Wednesday

CAMPUS BUZZ

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** City-based schools and colleges celebrated the third International Yoga Day on Wednesday.

The Shivaji University, Kolhapur (SUK) in association with the Maharashtra Times had organised a Yoga camp on its campus, which was attended by over 1,500 citizens.

According to varsity officials, the participants mostly consisted of students, teaching and non-teaching staff.

Devanand Shinde, vice-chancellor of SUK, who was present on the occassion, said, "The response garnered by yoga camp is quite encouraging and we are thinking of implementing it on a regular basis."

Shinde said that the citizens can participate in the daily yoga activities at the university's 'Lok Kala Kendra' from 6.30am to 7.30am every day.

The programme was organised after UGC's secretary Jaspal Sandhu's letter had stated that the United Nations General Assembly had passed the resolution to celebrate June 21 as International Yoga Day every year.

## DKTE students placed

Welspun India Limited, a private company, has recruited 17 students from DKTE's textile and engineering institute, Ichalkaranji. The students have been offered a package of Rs 3.2 lakh per annum, stated a DKTE circular. It added that the selection took place at the campus interview held at the institute earlier this month.

The selection process in the campus interview was rigorous and comprised of aptitude test, group discussion and technical and qualitative abilities. The training and placement officer for textile engineering S B Akiwate took efforts for this placement activity, it further stated.



Conferment of Autonomous Status by Hon. Dr. Devanand Shinde, Vice-Chancellor, Shivaji University, Kolhapur

18 years of EXCELLENCE in TECHNICAL EDUCATION

ADCET

DTE CODE : EN 6283

Sant Dnyaneshwar Shikshan Sanstha's

# ANNASAHEB DANGE COLLEGE OF ENGINEERING AND TECHNOLOGY, ASHTA.

## An Autonomous Institute

From the academic year 2017-18

## Learners Today ... Leaders Tomorrow...

History of more than **1000 students placed through Campus Recruitment** in Last 3 Years

**14 Rankers in Shivaji University** in May 2016 Exam

- **NAAC 'A' Grade Institute**
- **All Eligible Courses Accredited by NBA, New Delhi**
- **ISO 9001:2008 Certified Institute**

### Salient Features

- Highest number of faculties with Ph.D. qualification.
- Largest infrastructure facilities with modern amenities.
- Biggest library- One of the best in Maharashtra.
- Outcome based teaching methodology as per Washington Accord norms.
- Highest number of multimedia class rooms.
- Indoor, Outdoor, Gymnasium facility as per International Standards
- Bus facility from Sangli, Islampur, Pulus, Karad.
- Psychological Counseling facility.

### Courses offered...

| Undergraduate Courses... | Intake |
|---|---|
| **First Shift** | |
| Mechanical Engineering | 180 |
| Electronics & Telecommunication | 60 |
| Computer Science & Engineering | 60 |
| Electrical Engineering | 120 |
| Civil Engineering | 60 |
| Aeronautical Engineering | 60 |
| Automobile Engineering | 60 |
| **Second Shift** | |
| Mechanical Engineering | 60 |

| Post Graduate Courses... | Intake |
|---|---|
| Mechanical Engineering-Design | 18 |
| Electronics and Telecommunication | 18 |
| Computer Science and Engineering | 18 |
| Electrical Power Systems | 18 |
| Civil - Structural Engineering | 18 |

**Arguably the Best Technical Institute in Western Maharashtra**

vicreation / 9823243545



Ashta, Tal. Walwa, Dist. Sangli. 416 301 (Maharashtra) India.
Phone : 02342 - 241106
Email : profrak@rediffmail.com, head_admission@adcet.in

**Contact for Admission**

| Prof. R. A. Kanai<br>Executive Director<br>+91 9730377786 | Dr. A. M. Mulla<br>Principal<br>+91 8600339786 | Prof. S. B. Hivarekar<br>Head, Admission cell<br>+91 9689895057 | Mr. D. V. Adsul<br>Administrative Officer<br>+91 9960674000 |
|---|---|---|---|

## www.adcet.in



कोल्हापूर : विवेकानंदचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.

# विवेकानंद महाविद्यालय गुणवत्तेत प्रथम

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता शिष्यवृत्ती गुणगौरव समारंभात विवेकानंद कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी कला, वाणिज्य, विज्ञान या तीनही शाखेत शहरी गटातून सर्वाधिक शिष्यवृत्ती संपादन केल्या. विवेकानंद कॉलेज यावर्षीही गेल्या १७ वर्षाप्रमाणेच प्रथम क्रमांक पटकावून गुणवत्तेत अव्वल राहिले. याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांचा सत्कार कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. कल्लाप्पाण्णा आवाडे यांच्या अध्यक्षतेखाली डी. के. टी. ई. कॉलेज इचलकरंजी येथे कार्यक्रम झाला.

सत्काराला उत्तर देताना प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेचे कौतुक केले. विवेकानंद कॉलेजच्या यशाचे गमक सांगताना शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या 'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार' या ध्येयानुसार वाटचाल करणारे विद्यार्थी, प्राध्यापक यांचे हे सारे श्रेय आहे. त्याचप्रमाणे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या मानद सचिव प्राचार्या शुभांगी गावडे यांची प्रेरणा व मार्गदर्शन हे सातत्याने होत असल्याने हे यश मिळाले आहे. विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून प्राध्यापकांच्या सहकार्याने आम्ही यशस्वी विद्यार्थी घडविण्याचा ध्यास घेतला आहे.

प्रमुख पाहुणे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी विवेकानंद कॉलेजचे विद्यार्थी शिक्षक आणि प्राचार्य यांच्या यशाचे कौतुक केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

22 JUN 2017

तरुण भारत

# दूरशिक्षण केंद्राची आजपासून प्रवेश प्रक्रिया सुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रांतर्गत अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया गुरुवार, २२ रोजी सुरू होणार आहे. यामध्ये बी.ए., बी.कॉम. पदव्युत्तर एम.ए., एम.कॉम., एम.बी.ए., एम.एस्सी (गणित), पी.जी. डिप्लोमा इन ट्रान्सलेशन, या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतात. नियमित प्रवेश घेऊ न शकणारे किंवा महाविद्यालयातील वाढीव तुकड्या अभावी प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना पदवी अभ्यासक्रमांना प्रवेश घेता येणार आहे. दूरशिक्षण केंद्रांतर्गत घेतलेल्या पदवीचा उपयोग नोकरी मिळविण्यासाठी, सध्या असलेल्या नोकरीमध्ये वरिष्ठ श्रेणी, बढती प्राप्त करून घेण्यासाठी विविध स्पर्धा परीक्षांसाठी होईल. विद्यार्थ्यांनी आपल्या नजीकच्या अभ्यास केंद्रात प्रवेश निश्चित करण्याचे आवाहन दूर शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. एम. ए. अनुसे यांनी केले आहे.

22 JUN 2017

लोकमत

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण अभ्यासक्रमासाठी आजपासून अर्ज

## ऑनलाईन प्रक्रिया; शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील नव्या तेरा केंद्रांना मान्यता

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्रांतर्गत असलेल्या बी. ए., बी. कॉम., एम. ए., एम.बी.ए., एम. कॉम., एम. एस्सी. (गणित) अशा विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला आज, गुरुवारपासून प्रारंभ होणार आहे. यासाठी ऑनलाईन अर्ज करावयाचे आहेत. अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. १४ जुलै आहे.

अर्ज करण्यासाठी विद्यापीठाने ६६६.४ल्वरँ५ल्ल या संकेतस्थळावर 'डिस्टन्स एज्युकेशन' या नावाने लिंक उपलब्ध करून दिली आहे. अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांने पहिल्यांदा या लिंकवर पीआरएन क्रमांकाद्वारे नोंदणी करणे आवश्यक आहे. यानंतर विषयांची निवड करून त्यांची नोंद करावी. या पद्धतीने ऑनलाईन अर्ज दाखल केल्यानंतर त्याची स्थळप्रतीवर स्वाक्षरी करून गुणपत्रिकांची छायांकित प्रत जोडून आपल्या परिसरातील दूरशिक्षणाच्या अभ्यासकेंद्रावर जमा करावी. अर्ज करताना विद्यार्थ्यांना त्यांचे आधार कार्ड, बँक खात्याची माहिती आणि मतदान ओळखपत्र असणे आवश्यक आहे. दरम्यान, दूरशिक्षण केंद्राच्या अभ्यासकेंद्रामध्ये या वर्षी नव्याने १३ अभ्यासकेंद्रांची भर पडली आहे. त्यामुळे आता दूरशिक्षण केंद्राच्या अभ्यासकेंद्राचीएकूण संख्या ६० झाली आहे. प्रस्ताव दिल्यास संबंधित महाविद्यालयास अभ्यासकेंद्र सुरु करण्यास मान्यता देण्यात येईल, अशी माहिती प्रा. एम. ए. अनुसे यांनी पत्रकाद्वारे दिली.

### नवी अभ्यासकेंद्रे अशी

श्रीमती आक्काताई रामागोंडा पाटील कन्या महाविद्यालय (इचलकरंजी), लहू बाळा परितकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (पणोरे), कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय (गडहिंग्लज), श्री संत गाडगेबाबा महाविद्यालय (कापशी), गोपाळ कृष्ण गोखले कॉलेज (कोल्हापूर), आर्टस कॉलेज (कोवाड, ता. चंदगड), दूधसाखर महाविद्यालय (बिद्री), बळवंत कॉलेज (विटा), मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय (कडेगाव), विठ्ठल (दाजी) पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (सलगरे), सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज (कऱ्हाड), श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय (औंध), धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स ( सातारा).

### एम.ए., एम. कॉम.साठी 30 जूनपर्यंत मुदत

शिवाजी विद्यापीठातील नियमित एम. ए. आणि एम. कॉम. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत 30 जून आहे. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर याबाबतची अधिक माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे.

22 JUN 2017

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'दूरशिक्षण' जवळच

## प्रवेशप्रक्रिया आजपासून; अर्जासाठी १४ जुलैपर्यंत मुदत

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रमार्फत पदवी व पदव्युत्तर विषयाच्या प्रवेशाची प्रक्रिया गुरुवार २२ जूनपासून सुरू होत आहे. ऑनलाइन अर्ज www.unishivaji.ac.in या वेबसाइटवर डिस्टन्स एज्युकेशन या लिंकवर उपलब्ध असल्याची माहिती विद्यापीठ प्रशासनाने दिली आहे. दूरशिक्षण विभागातर्फे सुरू असलेल्या प्रवेशप्रक्रियेत बी.ए., बी.कॉम, एम. ए. (भाषा), एम. ए. (सामाजिक शास्त्र), एम. ए. (जैनॉलॉजी आणि प्राकृत), एम. ए. (लोकप्रकाशन) एम. कॉम., एम. एस्सी. (गणित) आणि डिप्लोमा इन ट्रान्स्लेशन या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. विद्यापीठाच्या वेबसाइटवरून स्टुडंट पोर्टल या लिंकवर प्रवेशाचे अर्ज खुले होणार आहेत.



| | |
|---|---|
| अर्ज जमा करण्याची मुदत | १४ जुलै |
| विलंब शुल्कासह अर्ज | १९ जुलै |
| अतिविलंब शुल्क अर्ज | २४ जुलै |

### आवश्यक कागदपत्रे

आधारकार्ड, मतदान ओळखपत्र, बँकेच्या खात्याची माहिती, आयएफएससी कोड, खातेक्रमांक

### असा भरा अर्ज

- अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी स्वत:चे ऑनलाइन रजिस्ट्रेशन करावे
- रजिस्ट्रेशनसाठी विद्यार्थ्यांनी पीआरएन नंबरचा वापर करावा
- ज्या विषयांचे स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध आहे असे विषय निवडावेत
- ऑनलाइन अर्ज भरल्यानंतर अर्जाची प्रिंट स्वाक्षरी करून त्यासोबत गुणपत्रिकेची छायाप्रत जोडून अभ्यासकेंद्रावर प्रवेश शुल्कासह जमा करावी.
- आवश्यक दाखल्यांसोबत ट्रान्सफर सर्टिफिकेट, लिव्हिंग सर्टिफिकेट, मायग्रेशन सर्टिफिकेट अर्ज सादर केल्यानंतर एक महिन्याच्या मुदतीत सादर करावे.

पुढारी

# दीर्घ काळासाठी शेअर मार्केटमधील गुंतवणूक गरजेची

## 'आरबीआय'च्या माजी डेप्युटी गव्हर्नर उषा थोरात यांचे आवाहन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

देशात सध्या अर्थव्यवस्थेसाठी पोषक वातावरण आहे. गुंतवणूकदारांसाठी ही परिस्थिती आश्वासक अशी आहे; परंतु शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करताना मार्केटचा अभ्यास करणे श्रेयस्कर आहे. गुंतवणूक ही काळजीपूर्वक करावी. सर्वात महत्त्वाचे म्हणजे गुंतवणूक ही योग्य परतावा मिळवण्यासाठी केली जाते. त्यामुळे दीर्घकाळासाठी शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करा, असे आवाहन 'आरबीआय'च्या माजी डेप्युटी गव्हर्नर उषा थोरात यांनी बुधवारी केले. कोल्हापूर इन्व्हेस्टर्स असोसिएशनच्या (केआयए) रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून उषा थोरात बोलत होत्या.

यावेळी विविध आर्थिक क्षेत्रांतील पदाधिकारी व केआयएचे पदाधिकारी उपस्थित होते. मान्यवर वक्त्यांनी शेअर मार्केट आणि अर्थव्यवस्थेची स्थिती यावर मौलिक मार्गदर्शन केले.

उषा थोरात म्हणाल्या, 'देशाचा विकासदर हा सात टक्के इतका आहे. एकंदरित अर्थवस्थेच्या दृष्टीने सकारात्मक बदल दिसत असले तरीही विकासदर हा नऊ ते दहा टक्क्यांवर जाऊन पोहोचणे आवश्यक आहे. यासाठी देशांतर्गत गुंतवणूकदारांनी मोठ्याप्रमाणातविविधक्षेत्रांतगुंतवणूक केली पाहिजे. याचबरोबर विदेशी गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी सतत प्रोत्साहन दिले पाहिजे. देशात परकीय गुंतवणूक मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे दिलासादायक चित्र आहे. गुंतवणूक ही सावकाश करण्याची प्रक्रिया आहे. यामध्ये सातत्य आणि संयमाची आवश्यकता आहे. विशेषत: तरुणांनी गुंतवणुकीसाठी पुढाकार घेण्याची वेळ आली आहे. महिला या उपजत व्यवस्थापक असतात, असे माझे मत आहे. त्यामुळे महिलांनीही आता स्वत:सह आपल्या मुलांना गुंतवणुकीबाबत जागृत करावे.'

**गुंतवणूकदारांना संधीची अनेक दालने खुली : नयन मेहता**

'बीएसई'चे चिफ फायनान्शिअल ऑफिसर नयन मेहता म्हणाले, 'आपण टी. व्ही., वॉशिंग मशिन खरेदी करताना त्याच्या ब्रँडपासून किमतीपर्यंत सर्व गोष्टींची बारकाईने माहिती घेतो. सर्व बाजूंनी विचार करून मगच वस्तू खरेदी करतो. हा आपला स्वभाव आहे. हा स्वभाव मार्केटमध्ये गुंतवणूक करताना असला पाहिजे. भारतीय अर्थव्यवस्था वेगाने वाढत आहे. याचाच अर्थ गुंतवणूकदारांना संधीची अनेक दालने खुली होत आहेत. गुंतवणूक करण्यापूर्वी मार्केटचा रिसर्च करा. अभ्यास करा. यानंतर गुंतवणूक कशी आणि कोठे करायची याचे नियोजन करून गुंतवणूक करा. एकदा गुंतवणूक केल्यावर मार्केटची स्थिती रोज बघण्याची गरज नाही. कारण, त्यामुळे आपण उगीचच अस्वस्थ होत राहतो.'

**मार्केटचा बारकाईने अभ्यास गरजेचा : माथूर**

'एमसीएक्स'चे मुख्य व्यवसाय विकास अधिकारी नवीन माथूर मार्केटमध्ये गुंतवणूक करताना सर्वप्रथम काय करायचे आणि काय करायचे नाही याचे पक्के नियोजन केले पाहिजे. आपण नेहमी बाजार सर्वोच्च पातळीवर पोहोचल्यावर हौसेने अखेरच्या क्षणी गुंतवणूक करायला धजावतो. यानंतर मार्केट हे अस्थिर असते, अशी चर्चा करण्यात वेळ घालवतो. मुळात मार्केट समतोल स्थितीत असताना संधी समजून अगोदर गुंतवणूक केली पाहिजे. गुंतवणूकदारांनी जे करायला नको ते करण्याची सवय सोडणे आवश्यक आहे. कारण, बहुतांश गुंतवणूकदार हे अल्पावधीतच ट्रेडिंग करण्यात मग्न होतात. गुंतवणुकीला चांगला परतावा पाहिजे असेल तर धोका पत्करण्याची तयारी ठेवावी. धोका पत्करलाच पाहिजे; परंतु यासाठी मार्केटचा बारकाईने अभ्यास केला पाहिजे.'




कोल्हापूर इन्व्हेस्टर्स असोसिएशनच्या (केआयए) रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त बुधवारी आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून बोलताना 'आरबीआय'च्या माजी गव्हर्नर उषा थोरात. यावेळी व्यासपीठावर डावीकडून मनीष झंवर, नयन मेहता, नरेंद्र मेहता, याझदी पीर, नवीन माथूर, रवी वाराणसी, अजित गुंदेशा आदी मान्यवर. (छाया : तय्यब अली)

### शिवाजी विद्यापीठात कॅपिटल शेअर मार्केट सर्टिफिकेट अभ्यासक्रम

यावेळी शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. व्ही. बी. ककडे यांनी शिवाजी विद्यापीठात 'कॅपिटल शेअर मार्केट' हा सर्टिफिकेट अभ्यासक्रम सुरू करण्याला कुलगुरू यांनी परवानगी दिल्याचे जाहीर केले. कोल्हापूर इन्व्हेस्टर असोसिएशन व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने हा कोर्स सुरू होणार आहे. कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत हा उपक्रम हाती घेण्यात आला असून यामुळे तरुण पिढीमध्ये शेअर मार्केटबद्दल जागृती निर्माण होण्यास मदत होणार आहे. शेअर बाजार जुगार नाही, तर सुरक्षित गुंतवणुकीचे योग्य ठिकाण आहे, असे त्यांनी सांगितले.

**'सेबी'मुळे गुतंवणूकदारांना जास्तीत जास्त सुरक्षितता : याझदी पीर**

यावेळी बोलताना 'सेबी'चे सहायक व्यवस्थापक याझदी पीर म्हणाले, 'कोल्हापूरमध्ये शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यासाठी कोल्हापूर इन्व्हेस्टमेंट असोसिएशनचे कार्य कौतुकास्पद आहे. सुरक्षित गुंतवणूक, योग्य वेळी, योग्य ठिकाणी कशी करावी, याचे योग्य मार्गदर्शन केले जात असल्याने कोल्हापुरातून जास्तीत जास्तीत जास्त गुंतवणुकीचे प्रमाण वाढावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. गेल्या काही वर्षांपासून शेअर मार्केटबाबत अनेक गैरसमज निर्माण झाले आहेत; पण 'सेबी'मुळे गुतंवणूकदारांना जास्तीत जास्त सुरक्षितता मिळते. म्हणूनच गेल्या काही वर्षांतील शेअर मार्केटमधील गुंतवणूक वाढत चालली असून अर्थव्यवस्थेला ती चालना देणारी आहे.'

**अभ्यास करून योग्य ठिकाणी गुंतवणूक करावी : देवन**

'बीएसई'चे सी. वासू देवन यांनी बीएसई संस्थेच्या स्थापनेला १४२ वर्षे झाली आहेत, असे सांगत पूर्वी गुंतवणूकदारांना गुंतवणूक करताना अनेक क्लिष्ट पद्धतींना सामोरे जावे लागत होते; पण आता नव्या तंत्रामुळे गुंतवणूकदारांना आता तत्काळ शेअर मार्केटची माहिती मिळू शकते. यासाठी मोबाईलवर खास ॲप्लिकेशन तयार करण्यात आले आहे. मार्केटची स्थिती दिवसेंदिवस बदलत असल्याने शेअरमध्ये चढ-उतार होत असतात. त्याचा अभ्यास करून योग्य ठिकाणी गुंतवणूक करावी, असे सांगितले.

**रिस्क घेणार त्याला परताव्याची संधी मिळणार : वाराणसी**

'एनसीई'चे मुख्य बिझनेस डेव्हलपेमेंट ऑफिसर रवी वाराणसी म्हणाले, 'सद्य:स्थितीत शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्याची सर्वाधिक चांगली संधी आहे. या ठिकाणी जो रिस्क घेणार त्याला परताव्याची संधी मिळणार, अल्प काळ गुंतवणूक करून तत्काळ उत्पन्नाची अपेक्षा न करता दीर्घ काळ गुंतवणुकीला प्राधान्य देणे गरजेचे आहे.'

**कधी गुंतवणूक करावी, याचे ज्ञान असणे आवश्यक : नरेंद्र मेहता**

गुंतवणूकदार व शेअर ब्रोकर यांच्यात लवाद म्हणून काम करणारे नरेंद्र मेहता यांनी सध्याच्या काळात शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारांना अनेक अधिकार प्राप्त झाले आहेत. आजच्या घडीला गुंतवणूकदारांना ब्रोकरविरोधात तक्रार दाखल करण्याचे अधिकार प्राप्त झाले आहेत. न्यायालयीन लढे लढण्यासाठी गुंतवणूकदारांना ठरावीक मर्यादेच्या गुंतवणुकीवर पैसे दिले जातात. त्यामुळे दाद मागण्यासाठी पूर्वीप्रमाणे गुंतवणूकदारांना स्वत:च्या खिशातून पैसे भरावे लागत नाहीत. शेअर मार्केटमध्ये तेजी-मंदीचा खेळ सुरू असतो. या काळात कधी गुंतवणूक करावी, याचे ज्ञान गुंतवणूकदारांना असणे आवश्यक आहे.'

यावेळी मनीष झंवर यांनी शेअर कोल्हापूर इन्व्हेस्टर असोसिएशनच्या रौप्यमहोत्सवी काळाचा आढावा घेतला, तसेच असोसिएशनच्या माध्यमातून केलेल्या उपक्रमांची माहिती दिली. यानिमित्ताने असोसिएशनच्या माजी अध्यक्ष व ज्येष्ठ सदस्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. प्रकाश संघवी, अवधूत चिकोडी, सुरेश पाटील, अजित गुंदेशा व संचालक उपस्थित होते.

